पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण

कॅम्प रोड , अमरावती, पिन – ४४४६०२, महाराष्ट्र

संपर्क – ०७२१- २६६५९३६,ई-मेल – sp.amravati.amr@mahapolice.gov.in

---

## विशेष पोलीस वार्तापत्र

दि.१६/०५/२०२४

### शेअर मार्केटचे नावावर ३१,३५०००/- रुपये ऑनलाईन फसवणुक प्रकरणात सहा आरोपींना अटक केल्याबाबात.

पोस्टे परतवाडा येथे अर्जदार नामे आशिष महादेवराव बोबडे वय – ४४ वर्ष रा. घामोडिया प्लॉट, परतवाडा ता. परतवाडा जि.अमरावती यांनी Fourth indian stock market Analysis and Learning नावाचे शेअर मार्केट व्हॉटसअॅप ग्रुपवर जॉईन केला. सदर गृपवर आलेल्या लिंकवर क्लिक करुन फिर्यादी यांनी त्यावर युझर आयडी व पासवर्ड बनविला व वेबसाईड लिंकदवारे फिर्यादी यांनी एकुण ३१,३५,०००/- रुपयांचे शेअर खरेदी केले. त्यानंतर फिर्यादी यांना पैशांची आवश्यकता असल्याने त्यांनी पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता सदर वेबसाईड बंद दिसुन आली तसेच सदर व्हॉटसअॅप गृपमधील मोबाईल क्र. वर कॉल केला असता ते बंद असल्याने आपली फसवणुक झाल्याचे फिर्यादी यांचे लक्षात आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन परतवाडा येथे अपराध क्र.१४५/२०२४ कलम ४१७, ४२० भा.द.वी. सहकलम ६६ (ड) माहीती तंत्रज्ञान कायदा २००० अन्वये गुन्हा नोंदविला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षा घेता मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद व मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत, यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. सायबर पोलीस निरिक्षक श्री. धिरेंद्रसिंग बिलवाल, स्था.गु.शा. पो.नि. किरण वानखडे, स.पो.नी. मनीष दुबे, स.पो.नि.किरण औटे, म.स.पो.नि. निर्मला भोई, स.पो.उपनि. सुनील बनसोड, पो.हवा. पंकज गोलाईतकर, पो.ना. सागर धापड, रितेश गोस्वामी, पो.कॉ. रोशन लकडे, गौरव गनथडे, मपोकॉ प्रिया मुंडेकर व सायबर टीमने फसवणूक करणाऱ्यांच्या तांत्रिक बाबींचे विश्लेशन केले असता असे लक्षात आले कि, आरोपी वेगवेगळे मोबाईल वापरत असुन कॉलव्दारे आप-आपसात संपर्क करुन तपास यंत्रणेची दिशाभुल करण्यासाठी वेगवेगळया बॅकखात्यामध्ये पैसे पाठविले. सदर बँक खात्यांची साखळी जोडुन आरोपीने विविध बँक खात्यामध्ये पैसे पाठविल्याचे तपशीलांचे माहीती घेवून जि. जांजगीर, रायपुर, सक्ती राज्य छत्तीसगड येथुन ४ आरोपींना अटक करण्यात आले होते.

अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या चौकशी दरम्यान आणखी काही सुगावा मिळाल्याने उर्वरित आरोपींना पकडणे करीता दि.१०/०५/२०२४ रोजी पोलीस पथक छत्तीसगढ राज्य येथे रवाना होवुन आरोपी १) रितेश अरुणकुमार अजगले वय २४ वर्ष धंदा मजूरी रा. ठठारी, जि. सक्ती, २)मायकल खेमलाल साहू वय २४ वर्ष धंदा मोबाईल शॉप दुकान रा. जैजैपुर जि. सक्ती, ३)रवींद्र राजेंद्र यादव वय २९ वर्ष रा. बसंतपूर,जि.राजनांदगाव, ४) अमन हरपाल पिता महादेव हरपाल वय ३८ वर्ष रा. कातुल बोर्ड,जि. दुर्ग ५) शैलेंद्रसिंग नारायणसिंग चव्हाण वय ३५ वर्ष रा. जुना बस स्टॉप, भरकापारा, जि. राजनांदगाव ६)दिगंत शशिकांत अवस्थी वय ३८ वर्ष रा. बनभेडी ABIS अपार्टमेंट जि. राजनांदगाव असे एकुण ६ आरोपींना पकडण्यात आले.

गुन्हयातील तपासात आरोपींने वापरलेल्या वेगवेगळया बँक खात्यांमध्ये जवळपास ७० लाख रुपये रक्कम गोठविण्यात आली तसेच आरोपी यांनी आभासी चलन (Virtual Currency ) मध्ये देवाण – घेवाण केल्याचे तपासात पुढे आले आहे. विशेष म्हणजे यातील अटक आरोपी हे विविध लोकांचे कॉर्पोरेट बँक खाते उघडुन ते बेकायदेशीर रित्या विविध आर्थिक फसवणुक करणेकरीता वापरण्यात आलेले आहेत तसेच सदर आरोपी कडुन IDFC बँकेचे ३ स्टॅम्प, प्रॉपरायटर स्टॅम्प् – ३, गाव ठेलकाडीह ग्रामपंचायत सरपंच यांचे नावे स्टॅम्प , HDFC BANK, AXIS BANK, ESAF BANK चे एकुण १७ DEBIT CARD, व HDFC, ICICI, SBI, RBC, INDUSINDE, ESAF, IDFC असे वेगवेगळया बँकेचे एकुण ७४ चेक, एकुण वेगवेगळया बॅंकेचे ६० पासबुक व एकुण १,०२,०००/- रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

गुन्हयामध्ये आणखी माहीती मिळविण्याची व आरोपी अटकेची तजविज ठेवण्यात आली आहे.

नागरीकांना मा. पोलीस अधीक्षक यांचे तर्फे आवाहन करण्यात येते की, कोणत्याही अनोळखी फोन कॉलवर विश्वास ठेवु नये. कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लीक करु नये. तसेच शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवणुकी करीता अज्ञात व्यकतीचा कॉल आल्यास खात्री करुन घ्यावी, पैस गुंतवणुक करीता अनोळखी ॲप वापरु नये. आपल्या बॅंक खात्याची, एटीएम/क्रेडिट कार्डची माहिती, अज्ञात मोबाईल धारकला देवू नये. तसेच आपली फसवणुक झाल्यास तात्काळ हेल्पलाईन नंबर १९३० वर कॉल करावा व सायबर पोलीस स्टेशन, अमरावती ग्रामीण येथे संपर्क साधावा.

( धिरेंन्द्रसिंग जि. बिलवाल )
पोलीस निरीक्षक
पो.स्टे. सायबर अमरावती ग्रामीण